# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.03.2026** **वारः रविवार**

---

• जगाशी स्पर्धा करण्यासाठी विद्यापीठांमधे आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोन असणारा अभ्यासक्रम असणंही गरजेचं आहे" : उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन

• उद्यापासून व्यावसायिक ग्राहकांसाठी आणखी २० टक्के एलपीजी गॅस देण्याची केंद्राची तयारी

• ईराणकडून होणारे हल्ले थांबवण्याचं तसंच होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्याचं 22 देशांकडून आवाहन आणि

•वरिष्ठ राष्ट्रीय टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत, मानव ठक्कर आणि यशस्विनी घोरपडे यांना एकेरीचं विजेतेपद

**उपराष्ट्रपती**

"हार्ड स्किल आणि सॉफ्ट स्कील यांची सांगड घालणाऱ्यांना भविष्यात स्थान राहील. जगाशी स्पर्धा करण्यासाठी विद्यापीठांमधे आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोन असणारा अभ्यासक्रम असणंही गरजेचं आहे", असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. मुंबईत रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभात काल उपराष्ट्रपती बोलत होते.

"आजच्या काळात विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळवणं पुरेसं नाही, तर ती पदवी रोजगारात रूपांतरित होणं आवश्यक आहे. आजच्या काळात तांत्रिक ज्ञानासोबतच सॉफ्ट स्किल्स आणि बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची क्षमता असणं ही यशाची गुरुकिल्ली मानली जाते. उद्योजक बनू इच्छिणाऱ्या तरुणांनी रतन टाटा यांचा आदर्श ठेवावा. नफा मिळवण्यासोबतच सामाजिक जबाबदारी कशी पार पाडावी, याचं टाटा हे उत्तम उदाहरण आहेत. प्रत्येक व्यक्तीची प्रगती ही समाजाची, राज्याची आणि पर्यायानं देशाची प्रगती असते, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी यावेळी केलं.

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री**

'एआय लिविंग लॅब' उपक्रमांतून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग क्षेत्रातील समस्या सोडवण्याचं प्रशिक्षण दिलं जात आहे ही अभिनंदनीय बाब असल्याचं यावेळी बोलतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

**<u>जैनदीक्षासमारंभ</u>**

जैन समाजाची सेवा, त्याग आणि अहिंसेची परंपरा समाजासाठी प्रेरणादायी – असल्याचं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल ६४ व्या जैन दीक्षा समारंभप्रसंगी ते बोलत होते. भगवान महावीरांनी दिलेला अहिंसा, अपरिग्रह आणि अनेकांतवादाचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरत असल्याचंही त्यांनी सांगितलं .

जैन धर्माचा संदेश शांतता, संयम आणि समन्वयाचा असल्याचं यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी याप्रसंगी बोलताना सांगितलं.

अहिंसा ही केवळ शारीरिक हिंसेपुरती मर्यादित नसून विचारांमध्येही हिंसा नसावी, हा संदेश जैन तत्वज्ञान देते. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीत मोठे योगदान देतानाच दान-पुण्याच्या क्षेत्रातही जैन समाज अग्रस्थानी असल्याचं  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

जैन समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

**<u>युवासंसद</u>**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन कालपासून 2 दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर असून काल सकाळी त्यांनी नागपूरमध्ये भारतीय युवा संसदेच्या २९व्या राष्ट्रीय अधिवेशनाला संबोधित केलं. जग सध्या युद्धाच्या छायेत असून त्यावर केवळ संवादाच्या मार्गानंच तोडगा निघू शकतो. भारतीय युवा संसद हे केवळ चर्चेचं व्यासपीठ नसून ते भविष्यात जबाबदार नागरिक घडविण्याचं  प्रभावी माध्यम आहे, असं ते यावेळी म्हणाले.

या परिषदेच्या माध्यमातून विचारांना आकार दिला जातो. चारित्र्याची जडणघडण होते. चारित्र्यनिर्मिती हाच भक्कम नेतृत्वाचा पाया आहे. जर आपलं  आयुष्य चारित्र्य संपन्न असेल, तर आपलं  नेतृत्व प्रभावी ठरेल, असं ते म्हणाले.

काल नागपुरात रेशीमबाग इथल्या महर्षी व्यास सभागृहात 29 व्या भारतीय युवा संसद परिषदेचं उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन आणि राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं.

**<u>रमजानईद-नवरोज</u>**

रमजान ईद देशात काल मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली. विविध राज्यांमध्ये ठिकठिकाणच्या ईदगाह मैदानांवर तसंच मशिदींमध्ये ईदनिमित्त नमाज अदा करण्यात आली.

पंतप्रधान मोदी यांनी ईद-उल-फित्र आणि नवरोजच्या निमित्तानं काल नागरिकांना शुभेच्छा दिल्या आणि सर्व समाजांमध्ये शांतता, समृद्धी आणि कल्याणासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

**<u>एलपीजी</u>**

व्यवसायिक ग्राहकांसाठी उद्यापासून आणखी २० टक्के एलपीजी गॅस देण्याची तयारी केंद्र सरकारनं दाखवली आहे. त्यामुळं राज्यांना त्यांच्या मासिक सरासरीच्या एकूण ५० टक्के एलपीजी मिळेल. खासगी उपहारगृह, ढाबे, हॉटेल, कंपन्यांमधली उपहार गृह, राज्य सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालवली जाणारी भोजनगृह, अन्न प्रक्रीया आणि डेअरी उद्योगाला हा व्यवसायिक एलपीजी देताना प्राधान्य दिलं जाणार आहे. याशिवाय ५ किलोचे सिलिंडर घेणाऱ्यांनाही प्राधान्य द्यायचे निर्देश केंद्रीय पेट्रोलियम सचिवांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात दिले आहेत.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेझेश्कियान यांच्याशी संवाद साधून ईद आणि नवरोजच्या शुभेच्छा दिल्या. या सणासुदीच्या काळात पश्चिम आशियामध्ये शांतता, स्थिरता आणि समृद्धी नांदो, अशी सदिच्छा दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली. समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये पंतप्रधान मोदींनी या प्रदेशातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवरील हल्ल्यांचा निषेध केला. त्यांनी जलसंचार स्वातंत्र्याचं रक्षण करण्याचं तसंच सागरी मार्ग खुले आणि सुरक्षित राहतील याची खात्री करण्याचं महत्त्व अधोरेखित केलं. इराणमधील भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी इराणने दिलेल्या सततच्या पाठिंब्याबद्दल मोदींनी कौतुक केलं.

**<u>इराण-दिमोना-हल्ला</u>**

इराणशी संबंधित माध्यमांच्या दाव्यानुसार, इस्रायलच्या दिमोना आणि नेगेव्ह अणुसंशोधन केंद्राच्या परिसरात इराणकडून क्षेपणास्त्रे डागण्यात आली. इराणच्या बुशेहर आणि नतान्झ अणुसुविधांवर अमेरिका आणि इस्रायलनं केलेल्या हल्ल्यांचा हा बदला असल्याचं त्यात म्हंटलं आहे. इस्रायली अधिकाऱ्यांनी अणु-संबंधित ठिकाणी कोणत्याही मोठ्या नुकसानीची पुष्टी केलेली नाही, तथापि अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर हवाई-संरक्षण हालचाली झाल्याचं कळवलं आहे.

दरम्यान, संयुक्त अरब अमिरातीमधील रास अल खैमाह प्रशासनानं येणारे धोके हवाई संरक्षण यंत्रणांनी यशस्वीरित्या निष्प्रभ केल्याची पुष्टी केली आहे. त्यांनी नागरिकांना केवळ अधिकृत स्रोतांवर विश्वास ठेवण्याचं आणि समाज माध्यमावर अफवा न पसरवण्याचं आवाहन केलं आहे.

**<u>इराण-आवाहन</u>**

बावीस देशांनी काल इराणला हल्ले थांबवण्याचं आणि होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्याचं आवाहन केलं असून, याचे जागतिक परिणाम होतील असा इशारा दिला आहे.

संयुक्त अरब अमिरात, बहारीन, युनायटेड किंगडम, जर्मनी, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया आणि ऑस्ट्रेलिया यांसह 22 देशांनी एका संयुक्त निवेदनात या प्रदेशातील व्यापारी जहाजं आणि ऊर्जा सुविधांवरील

इराणच्या हल्ल्यांचा निषेध केला. अशा कृतींचा परिणाम जगभर, विशेषतः गरीब देशांवर जाणवेल असा इशारा त्यांनी दिला आणि तणाव तत्काळ कमी करण्याचं आवाहन केलं.

**<u>भारत-आफ्रिकापरिषद</u>**

आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी, आपल्या सन्मानासाठी आणि संधी उपलब्ध करून देण्यासाठी वीज ही अत्यंत महत्त्वाची असल्याचं ऊर्जा मंत्री मनोहर लाल यांनी म्हटलं आहे. जागतिक ऊर्जा जोडणीसाठी परिवर्तनकारी मार्ग म्हणून 'एक सूर्य, एक जग, एक ग्रीड' या संकल्पनेवर त्यांनी प्रकाश टाकला. काल नवी दिल्ली इथे आयोजित 'भारत विद्युत शिखर परिषद २०२६ च्या तिसऱ्या दिवशी भारत-आफ्रिका धोरणात्मक भागीदारी बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून लाल बोलत होते. या बैठकीला लाल यांच्यासमवेत ऊर्जा आणि नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी, मालावीचे ऊर्जा आणि खाण मंत्री डॉ. जीन मथांगा, तसंच अनेक आफ्रिकन देशांचे मंत्री आणि उद्योगपती उपस्थित होते.

भारत आणि आफ्रिका हे दोन्ही देश  नवीकरणीय ऊर्जेचा विस्तार, आंतरजोडणी ग्रीड प्रणालीचा विकास, ऊर्जा साठवण आणि लवचिक उपाय तसंच संस्थात्मक बळकटीतून  क्षमता बांधणीच्या क्षेत्रांमध्ये एकत्रितपणे काम करणार आहेत.

**<u>पतहमीसुधारणा</u>**

२०२५-२६ च्या अर्थसंकल्पानुसार, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या उत्पादक आणि निर्यातदारांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने परस्पर पत हमी योजनेत मोठे बदल केले आहेत. सुधारित योजनेअंतर्गत, पाच टक्के आगाऊ रक्कम चौथ्या वर्षानंतर हप्त्यांमध्ये परत केली जाऊ शकते. समाधानकारक पत कामगिरीवर चौथ्या वर्षापासून पुढे दरवर्षी या रकमेपैकी एक टक्का रक्कम परत केली जाईल. सेवा क्षेत्रातील एमएसएमईंचा समावेश करण्यासाठी पात्रतेचे निकष वाढवण्यात आले आहेत. यंत्रसामग्री आणि उपकरणांसाठी किमान प्रकल्प खर्चाची आवश्यकता पूर्वीच्या ७५ टक्क्यांवरून ६० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत, यंत्रसामग्री तसंच उपकरणे खरेदी करण्यासाठी १०० कोटी रुपयांपर्यंतच्या मुदत कर्जावर पात्र सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना ६० टक्के हमी संरक्षण दिलं जातं. यामध्ये नॅशनल क्रेडिट गॅरंटी ट्रस्टी कंपनी लिमिटेडच्या सहकार्याने , हमी देऊन बँकांकडून कर्ज मिळवणे सुलभ होतं.

या सुधारणांमुळे योजनेचा विस्तार होऊन अनुपालनाचा भार कमी होईल आणि निर्यात करणाऱ्या एमएसएमईंना प्रोत्साहन मिळेल असं अर्थ मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलं आहे.

**<u>टेबलटेनिस</u>**

काल इंदूर येथे पार पडलेल्या वरिष्ठ राष्ट्रीय टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत, 'पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड'चे खेळाडू मानव ठक्कर आणि यशस्विनी घोरपडे यांनी आपापले पहिलं वहिलं  एकेरीचं  विजेतेपद पटकावलं. पुरुषांच्या अंतिम फेरीत अव्वल मानांकित मानवने जीत चंद्रचा ४-१ ने पराभव केला, तर

महिलांच्या विजेतेपदासाठी झालेल्या अटीतटीच्या लढतीत यशस्विनीने सिंड्रेला दासवर ४-३ ने मात केली. मिश्र दुहेरीमध्ये, अंकुर भट्टाचार्जी आणि सुहाना सैनी या जोडीने अनिकेत बोस आणि संप्रिती रॉय यांचा ३-२ ने पराभव करत सुवर्णपदकावर नाव कोरले.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार**